# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## अंतर्गत परिपत्रक क्र. – ११५/ २०२१

विद्यापीठ परिसरातील निवासस्थानांची व त्याच्या सभोवतालच्या परिसराची पाहणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, निवासस्थानांच्या / इमारतींच्या मोकळया जागेत व सभोवतालच्या परिसरात मोठया प्रमाणावर भंगार, रद्दी सामान, लाकडे, लोखंडी खांब, घरातील निरुपयोगी वस्तू पडलेल्या आहेत. लवकरच पावसाळयाला सुरवात होत असल्याने आहे. सदर वस्तूंमध्ये पाणी साचून डास व इतर किटकांचा प्रादुर्भाव वाढू शकतो. यामुळे मलेरीया, डेंगू किंवा इतर साथीचे आजार पसरु शकतात.

त्यामुळे विद्यापीठ परिसरातील निवासस्थानांमध्ये राहणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, आपण रहात असलेल्या निवासस्थानांच्या आजूबाजूला अशा प्रकारचे सामान टाकू नये. विशेषत: इमारतीमधील मोकळया जागेमध्ये, वरांडयात, गच्चीवर, जिन्याखाली घरातील सामान ठेवू नये. (जुन्या वापरात नसलेल्या सायकली, वापरत नसलेली वाहने, वॉशिंग मशीन, टेबल, रॅक, वापरत नसलेल्या निरुपयोगी वस्तू, पक्षांची घरटे, बॉक्स, झुंबर, कुंडया) तसेच या वस्तू येत्या दोन दिवसात काढून घ्याव्यात अन्यथा स्थावर विभागामार्फत त्यांची विल्हेवाट लावण्यात येईल.

असे ही निदर्शनास आले आहे की स्थावर विभागाची पूर्व परवानगी न घेता निवासस्थानांमध्ये / इमारतीमध्ये व निवासस्थानांच्या परिसरात शेड, कच्चे, पक्के बांधकाम करुन जागा बंदिस्त केलेल्या आहेत. काही आपत्कालीन परिस्थीती उद्‌भवल्यास मदतकार्य करताना सदर बाबींचा अडथळा ठरणार आहेत. त्यामुळे असे बांधकाम त्वरीत काढून घ्यावे अन्यथा विद्यापीठाकडून काढून घेण्यात येईल व सदर कार्यवाहीसाठी येणाऱ्या खर्चाच्या पाचपट रक्कम संबंधीत सेवकांकडून वसूल करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सर्व संबधितांनी परिपत्रकातील नमूद बाबींची नोंद घेवून सहकार्य करावे.

डॉ. प्रफुल्ल पवार
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे – ४११००७,
जावक क्र. गृव्य/८६३
दिनांक : ०५/०५/२०२१

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणीक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

} सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबधीत सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.